

मुगल-ए-आझमच्या प्रिमियर प्रसंगी शम्मी, सितारादेवी, के. आसिफ आणि राज कपूर

एक्स्ट्रा ते एक्स्ट्रा ऑर्डिनरी


***भिं**तीला पोस्टर लावण्याच्या रोजगारीवरील कामाने नाना पाटेकर या क्षेत्रात आला. अक्षयकुमार एका रेस्टॉरंटमध्ये समोसा तळायचं काम करत होता. आसिफजी पेशाने शिंपी होते. पडद्यावर अगदी सामान्य कमाईने सुरुवात करणाऱ्या काही असमान्य कलाकारांविषयी...*

□ नरेंद्र उपाध्याय

मुगल-ए-आझमसारख्या सुपर हिट चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक के. आसिफ पेशाने शिंपी होते. हे ऐकल्यावर तुम्हाला आश्चर्य वाटलं ना? लोकांचे कपडे शिवून उदरनिर्वाह करत होते. भविष्यात ते दिग्दर्शनाच्या क्षेत्रात उतरतील आणि इतकी लोकप्रियता मिळवतील याची कधी कोणी स्वप्नातही कल्पना केली नसेल. के. आसिफसारखे या इंडस्ट्रीत अनेक रथी महारथी झाले. ज्यांनी अगदी सुमार कामं करून या क्षेत्रात प्रवेश मिळवला आणि मागाहून इथे अधिराज्य केलं.

केदार शर्मांकडे तिसऱ्या क्रमांकाचा सहाय्यक म्हणून कारकीर्दीची सुरुवात करणाऱ्या राज कपूरच्या नावाचा नंतर इंडस्ट्रीत किती दबदबा होता हे नव्याने सांगायला नको. मात्र सुरुवातीला राज कपूर प्रत्येक शॉटच्या आधी क्लॅप देण्याचं काम करत असत. थोडक्यात ते क्लॅपर बॉय होते. त्यावेळीही नजरेत स्वप्नं होती अभिनेता बनण्याची. म्हणूनच क्लॅप देण्यासाठी जेव्हा जेव्हा पुढे व्हायचे. आठवणीने खिशातून कंगवा काढून आपले केस नीटनेटके करायचे. क्लॅप देता देता संधी मिळेल तेव्हा कॅमेऱ्यात डोकवायलाही ते विसरत नसत. त्यामुळे क्लॅपर बोर्डपेक्षा त्यांचं लक्ष कॅमेऱ्यावरच अधिक असायचं. परिणामी, *नीलकमल*च्या सेटवर नृत्य करणाऱ्या एका कलाकाराची नकली दाढी क्लॅपमध्ये अडकून निघून आली आणि केदार शर्मांनी राजच्या श्रीमुखात भडकावली. तरीही अभिनयाचं आणि कॅमेऱ्याचं आकर्षण तीळमात्र कमी झालं नाही.

काहीही असो. राज केदार शर्मांचे खास मित्र पृथ्वीराज कपूर यांचा



राज कपूर



लता मंगेशकर



अशोककुमार



सरोज खान

मुलगा असल्याने दुसऱ्याच दिवशी केदारजींनी त्यांना *नीलकमल*च्या नायकाचा रोल देऊ केला. केदार शर्मांनी तिसऱ्या क्रमांकाच्या या सहाय्यकामधले गुण नेमके हेरून इंडस्ट्रीला एक हिरा दिला.

चार-पाच पिढ्यांसाठी आपला आवाज देणाऱ्या लता मंगेशकर यांनीही या क्षेत्रात एक सामान्य अभिनेत्री म्हणूनच पदार्पण केलं होतं. दीनानाथ मंगेशकरांच्या नाटकांत लताजी अभिनय करत असत. एकदा नाटकादरम्यान वडिलांनी लेकीच्या मुस्कटात मारली. इतकी जोरदार की, छोट्या लताच्या डोळ्यांसमोर अंधारी आली आणि कानालाही थोडीफार दुखापत झाली. पुढे त्याच लताच्या मधुर स्वरांनी इतरांच्या कानांना आपल्या सुरांचं व्यसन लावलं.

सदाबहार अभिनेता अशोककुमारही बॉम्बे टॉकिजमध्ये लॅब असिस्टंट म्हणून काम करत होते. एकदा बॉम्बे टॉकीजचे मालक हिमांशु राय यांनी देविका राणींचा नायक बनण्याची गळ घातली. त्यावेळी दादामुनींना असं काही कापरं भरलं की, पुढचे दोन दिवस ते कामावरच आले नाहीत. तिसऱ्या दिवशी कामावर आले. पण डोकं भादरुन. त्यांचा अवतार पाहून हिमांशु रायनी कपाळाला हात लावला. तेही मग जिद्दीलाच पेटले. विग घालून त्यांनी अशोककुमारला कॅमेऱ्यासमोर उभं केलंच. त्यांच्या आयुष्यातला तो सर्वात मोठा टर्निंग पॉईंट ठरला.

आजची लोकप्रिय आणि यशस्वी कोरियोग्राफर सरोज खान हिचा जन्मही एका निर्धन कुटुंबात झालेला. वयाच्या दहाव्या वर्षी तिने एक्स्ट्रा म्हणून काम सुरु केलं. मग तिने नृत्याच्या स्टेप्स शिकवायला सुरुवात केली. तेरा वर्षांची ही मुलगी भविष्यात मोठी नृत्य दिग्दर्शिका होईल, याची तिला तरी त्यावेळी कल्पना होती का?

सरोज खानप्रमाणे प्रसिद्ध नर्तकी हेलन हिनेही एक एक्स्ट्रा म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली होती. हेलन एक निर्वासित म्हणून सहकुटुंब ब्रह्मदेशातून भारतात आली होती. मुंबईतल्या फुटपाथवर ती सहकुटुंब राहात होती. त्यावेळी निर्माता-दिग्दर्शक पी.एन.अरोरा यांनी तिला आपल्या चित्रपटात एक्स्ट्रा नर्तकी बनवली आणि आपल्याच घरातल्या गॅरेजमध्ये तिची राहायची सोयही केली. अथक परिश्रम आणि निष्ठेच्या जोरावर हेलनने या क्षेत्रात नर्तकी म्हणून आपली खास जागा निर्माण केली. कॅब्रे नृत्यातून तिने हिंदी चित्रपटांत नाव आणि लोकप्रियता दोन्ही मिळवलं. एका सामान्य नर्तकीतून घडलेल्या या असामान्य नृत्यांगनेइतकं यश मागाहून इंडस्ट्रीत आलेल्या कोणत्याच डान्सरला मिळवता आलं नाही. तिच्या नृत्यसंन्यासाने निर्माण झालेली पोकळी भरून काढणारी नर्तकी आजही इंडस्ट्रीला सापडलेली नाही.

भगवानदादा, जॉनी वॉकर आणि मेहमूदसारखे विनोदवीर क्षेत्रात एक्स्ट्रा म्हणूनच आले होते. *बेवफा आशिक*साठी दिग्दर्शकाला लंगड्याची भूमिका करू शकेल असा एक कलाकार हवा होता. ज्युनियर कलाकारांच्या गर्दीत असलेल्या भगवानदादांकडे त्यांचं लक्ष गेलं. त्यांनी भगवानदादांना जवळ बोलावून लंगड्याचं काम करशील का? म्हणून विचारलं. उत्तरादाखल भगवानदादांनी लंगड्यासारखं चालून दाखवलं. दिग्दर्शकाने त्यांना साठ रुपये पगारावर छोट्या छोट्या भूमिकांसाठी आपल्या कंपनीत नोकरीवर ठेवून घेतलं. त्याच छोट्या भूमिकांची शिडी करून मास्टर भगवान इंडस्ट्रीतले असामान्य अभिनेता-लेखक-दिग्दर्शक आणि निर्माता बनले. इंडस्ट्रीतले आणखी एक नावाजलेले विनोदी अभिनेते बद्रुद्दीन काझी यांनीही बस कंडक्टर म्हणून बसमधून प्रवास करता करता अभिनयाच्या क्षेत्राकडे आपली गाडी वळवली. एक एक्स्ट्रा म्हणूनच. *आखरी बाझी*मध्ये त्यांनी साकारलेली दारुड्याची भूमिका लोकांच्या कायमची लक्षात राहिली. पुढे जाता त्यांनी या इंडस्ट्रीत एक अविस्मरणीय कॉमेडीयन म्हणून स्वतःची छबी उभी केली. तीच गोष्ट मेहमूदची. त्यांचे पिता मुमताज अली आणि मोठी बहीण चित्रपटांत कोरस डान्सर म्हणून काम करत होते. एक्स्ट्रा म्हणून कारकीर्दीचा पाया घालणाऱ्या मेहमूदनेही नंतर यशस्वी कॉमेडीयन, निर्माता, दिग्दर्शक म्हणून दीर्घ टप्पा गाठला.

सुनील दत्त (बलदेव), राज खोसला आणि सुरेश ओबेरॉयसारख्या प्रतिभावंतांनी रेडियोच्या माध्यमातून चित्रपटक्षेत्रात पदार्पण केलं होतं. सुनील दत्त ऑल इंडिया रेडियोवर अनाउन्सर म्हणून महिना दीडशे रुपये पगारावर काम करत होते. त्यावेळी त्यांना तत्कालीन हिट अभिनेत्री नरगीसच्या मुलाखतीसाठी पाठवण्यात आलं होतं. नरगीसची मुलाखत घेताना सुनीलसाहेबांना दरदरुन घाम फुटला होता. मागाहून तेच बलराज दत्त सुनील दत्त नावाने यशस्वी कलाकार म्हणून पडद्यावर आले. इतकंच नाही तर, त्याच नरगीसशी आयुष्यभराचं नातं जोडलं.

राज खोसलांनीही सिंगर म्हणून ऑल इंडिया रेडियोवर काम केलं, तेही बिनपगारी. परंतु, गायक न बनता राज खोसला नावारुपाला आले ते एक यशस्वी दिग्दर्शक म्हणून. गायक म्हणून त्यांचा संघर्ष चालूच होता. त्यावेळी गुरु दत्त यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम सुरू केलं. *दो रास्ते, मैं तुलसी तेरे आंगन की* आणि *मेरा गाव मेरा देश*सारख्या चित्रपटांची निर्मिती करून त्यांनी लोकांना दखल घ्यायला लावलीच.


हेलन


भगवानदादा


जॉनी वॉकर


महेमूद


सुनील दत्त